## कामगार शिक्षकाच्या कर्तृत्वातून देशाचा विकास - चौधरी




कामगार शिक्षक हा ज्ञानी होऊन भावी जीवनात कामगारांना मार्गदर्शन करण्याची शक्ती कामगार शिक्षकामध्ये आहे. कामगार शिक्षकांनी आपल्या उद्योगात कामगारांमध्ये आत्मविश्वास निर्माण करुन राष्ट्रहित जोपासावे असे प्रतिपादन श्री.पी.एम. चौधरी यांनी केंद्रिय कामगार शिक्षण बोर्ड, भारत सरकार, उपप्रादेशिक संचालक, नाशिक यांच्या ४५ दिवसांचे कामगार शिक्षक प्रशिक्षणार्थींना समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी मार्गदर्शन केले. स्वामी समर्थ मंगल कार्यालय कॅनडा कॉर्नर येथे कामगार शिक्षक अभ्यासक्रमाचा समारोप झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिंद्रा अॅन्ड महिंद्रा सातपूरच्या कामगार संघटनेचे अध्यक्ष माधवराव धात्रक होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे महाव्यवस्थापक श्री. पी.एम. चौधरी, कामगार कल्याण अधिकारी श्री. पी.एल. वारजुरकर, एच.ए. एल. कामगार संघटनेचे अध्यक्ष श्री. तुकाराम मंडलिक, प्रादेशिक संचालक श्री. आर.जे. वानखेडे, कामगार शिक्षण अधिकारी श्री. गुलाबराव सोनावणे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजनाने झाली. आयोजकांच्या वतीने प्रमुख पाहुण्यांना शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रशिक्षणार्थी विवेक मायाळू, प्रविण पाटील, सुरेश भवर, अनिल सोनार, श्रीकांत धर्माधिकारी यांनी आपले प्रशिक्षणातील अनुभव व्यक्त केलेत. कामगार शिक्षकांनी कामगारांना प्रशिक्षित करुन उद्योगांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजवावी, असे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री माधवराव धात्रक यांनी व्यक्त केले तर कामगार शिक्षण योजनेतून कामगार शिक्षक हे राष्ट्राचा विकास साधतील असे प्रादेशिक संचालक श्री. आर.जे. वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच पी.एल. वारजुरकर, तुकाराम मंडलिक यांनी मार्गदर्शन केले. पाहुण्यांच्या हस्ते विशेष प्राविण्य मिळवलेले प्रशिक्षणार्थी प्रथम क्रमांक रोहिदास तुकाराम चौधरी (महिंद्र इगतपुरी), द्वितीय क्रमांक दिपक वसंतराव पाटील (एच.ए.एल.), तृतीय क्रमांक विभागून उत्तम जे. गांगुर्डे (रेल्वे मनमाड) गोविंदा जयाराम देसले (महिंद्र सातपूर), उत्तेजनार्थ नरेंद्र नारायण कलंकार (नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे) यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. सारिका डफरे यांनी केले तर आभार नंदूकुमार भास्कर चव्हाण यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कैलास सुतार, रघुनाथ सुर्यवंशी, संजीव अहिरे, मारुती जाधव, अमोल जोशी, माधव जाधव, नरेंद्र कलंकार यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## कोराडी औष्णिक वीज केंद्रात "पॉवर प्लांट केमेस्ट्री फॉर परफॉर्मन्स एक्सलन्स प्रशिक्षण" चे आयोजन केले होते



कोराडी औष्णिक वीज केंद्रातील ट्रेनिंग सब सेंटरचे दिनांक २२/१२/२००९ ते २४/१२/२००९ पर्यंत केमिस्टकरिता "पॉवर प्लांट केमेस्ट्री फॉर परफॉर्मन्स एक्सलन्स" हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या ट्रेनिंगचे आयोजन कार्यकारी रसायनतज्ञ आणि विभागातील कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेनुसार आणि कार्याची गुणवत्ता वाढविण्याचे दृष्टीने आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन मा. कार्यकारी संचालक श्री. चौधरी यांनी दिप प्रज्वलन करुन केले. या प्रसंगी कोराडी ट्रेनिंग सेंटरचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. एल.आर. कढाव आणि अधिक्षक अभियंता श्री. वाघमारे, कार्यकारी अभियंता श्री. सावजी तसेच सर्व अभियंता वर्ग हजर होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष टप्पा-२ चे महाव्यवस्थापक श्री. कुलकर्णी होते. या प्रसंगी चौधरी यांनी आपल्या कंपनीच्या परिस्थितीची जाणीव करुन दिली त्याचप्रमाणे परफॉर्मन्स वाढविणाऱ्या कल्पना नॉलेज फोरमच्या माध्यमातून पाठविल्यास उत्कृष्ट कल्पनांना प्राधान्य देता येईल असे आश्वासन दिले. या प्रसंगी काही रसायनतज्ञांनी एन.टी.पी.सी. च्या औष्णिक वीज केंद्राला भेटी दिल्यास तेथील कार्यपध्दतीची माहिती करुन घेण्याची ईच्छा व्यक्त केली असता या प्रस्तावाला त्यांनी लगेच होकार दिला. या प्रशिक्षणाला विविध अनुभवी प्रशिक्षक लाभले. समारोपीय कार्यक्रमापूर्वी परीक्षा घेण्यात आली यात सर्व प्रशिक्षणार्थी उत्कृष्ट गुणाने पास झाले.या प्रशिक्षणाचा लाभ जलप्रक्रिया विभागातील २२ कर्मचाऱ्यांनी घेतला. या प्रशिक्षणाचे आयोजन ट्रेनिंग सब सेंटरच्या को-ऑर्डिनेटर सौ. संस्कृती रहाटे यांनी तसेच कार्यकारी रसायनतज्ञ श्री. धते आणि श्री. रामटेके यांनी केले. या संपूर्ण प्रशिक्षणाला मा. मुख्य महाव्यवस्थापक श्री. थुटूरकर, महाव्यवस्थापक श्री. कुलकर्णी, श्री. नागदिवे तसेच अधीक्षक अभियंता श्री. चामलाटे, श्री. डांगरे, कोराडी ट्रेनिंग सेंटरचे मुख्य महाव्यवस्थापक कढाव व श्री. सावजी यांचे मार्गदर्शन लाभले.

नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे येथील प्रवेशद्वारावर दिनांक २६/११/२००९ रोजी दुपारी १२.०० वा. मुंबई येथे दिनांक २६/११/२००८ रोजी झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्यात धारातीर्थी पडलेल्या शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. श्री. पंजाबराव खंडारे यांनी संविधानाचे प्रास्ताविक वाचन केले. श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मुख्य महाव्यवस्थापक, महाव्यवस्थापक, टप्पा क्र. १ व २ तसेच औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.